# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.04.2025** **वारःशुक्रवार**

---

1) जवळपास १२ तासांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर वक्फ सुधारणा विधेयकाला राज्यसभेची मंजुरी
2) पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होणार,
3) भारत आणि थायलंड दरम्यान विविध क्षेत्रात सहकार्यासाठी सहा करारांवर स्वाक्षरी
4) ज्येष्ठ चित्रपट अभिनेते मनोज कुमार यांचं निधन

आणि

5) आय पी एल क्रिकेट स्पर्धेच्या साखळी सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सचा, सनरायझर्स हैदराबाद संघावर ८० धावांनी विजय

**<u>वक्फ-राज्यसभा</u>**

वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ ला काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. सुमारे १२ तासांच्या चर्चेनंतर १२८ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं, तर, ९५ सदस्यांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं आहे.
या विधेयकाचा फायदा विधेयकाचा लाभ केवळ आणि केवळ मुस्लिम समुदायाला होणार असून, वक्फ बोर्डाकडे असलेल्या संपत्ती व्यवस्थापनात बिगर मुस्लिम समुदायाचा हस्तक्षेप असणार नाही, असं, अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

या विधेयकाचे मूळ उद्दिष्ट वक्फ मालमत्तांमध्ये सुधारणा आणि योग्य व्यवस्थापन आणणे आहे असं केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जे.पी. नड्डा चर्चेत भाग घेताना म्हणाले.

काँग्रेसच्या राजवटीत गरीब मुस्लिमांचं जीवनमान सुधारण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत असा आरोप भाजपचे राधा मोहन दास यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब मुस्लिम समुदायांच्या भल्यासाठी हे विधेयक आणलं असल्याचं ते पुढे म्हणाले.

राज्यसभेत काल या विधेयंकावर झालेल्या चर्चेदरम्यान, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधेयकाचं स्वागत केलं तर, विरोधी पक्षांनी विधेयकाविरुद्ध आणि केंद्र सरकारविरुद्ध टीकेचा सुर लावला होता.

धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी या विधेयकाला समर्थन दिलं. हे विधेयक मुस्लिम समुदायाच्या धार्मिक बाबींत हस्तक्षेप करत नसून, केवळ उत्पन्न आणि प्राशासनिक बाबींशी संबंधित असल्याचं ते म्हणाले.

विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी या विधेयकावर आक्षेप घेत ते मागे घेण्याची मागणी केली. या विधेयकांत अनेक त्रुटि असून, ते घटनाबाह्य असल्याचं खरगे म्हणाले.
हे विधेयक दिशाभूल करणारं असून, त्यामुळे धार्मिक ध्रुवीकरण होत असल्याचं काँग्रेसचे डॉक्टर सय्यद नासिर हुसेन म्हणाले. तर, हे विधेयक एका विशिष्ट धार्मिक समुदायाला लक्ष्य करत असल्याचं, द्रमुकच्या तिरूची सिवा यांनी सांगितलं.

संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक, २०२५ लाही मान्यता दिली, ज्याच्या प्रभावामुळे मुस्लिम वक्फ कायदा १९२३ रद्द होतो. हे विधेयकही काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं.

**मणीपुर**
मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीला घटनात्मक मान्यता देण्याचा ठराव राज्यसभेत आज पहाटे मंजूर करण्यात आला. लोकसभेत हा ठराव या आधीच मंजूर झाला आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून मणिपूरमध्ये कोणताही हिंसाचार झाला नाही, असं या ठरावावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. मणीपुर मधील परिस्थिति हाताळण्यात अपयशी ठरल्यामुळे राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली असल्याचा विरोधकांचा आरोपही त्यांनी फेटाळून लावला.

**बिमस्टेक**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज थायलंडमध्ये बँकॉक इथं आयोजित ६ व्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. 'समृद्ध, लवचिक आणि खुला - बिमस्टेक-' अशी या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. या परिषदेत बिमस्टेकची भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी बँकॉक व्हिजन २०३० ला आणि बिमस्टेकच्या प्रख्यात व्यक्ती गटाने दिलेल्या अहवालाला स्वीकृती दिली जाणार आहे. बिमस्टेक गटात बांगलादेश, भूतान, भारत, म्यामा, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड या सात देशांचा समावेश असून भारत या गटाच्या चार संस्थापक सदस्यांपैकी एक आहे.

**भारत-थायलंडकरार**
तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी काल दोन दिवसांच्या थायलंड भेटीसाठी बँकॉक इथं पोहोचले. पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या थायलंडच्या समपदस्थ पेतोंगतार्न शिनवात्रा यांच्यात काल दुपारी बँकॉक इथं द्विपक्षीय चर्चा झाली, त्यानंतर दोन्ही देशांदरम्यान माहिती तंत्रज्ञान, सागरीक्षेत्र, एमएसएमई, हस्तकला आणि हातमाग अशा अनेकविध क्षेत्रात सहकार्यासाठीच्या सहा करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. तर द्विपक्षीय भेटीत दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या चौफेर प्रगतीचा आढावा घेऊन भारत-थायलंड द्विपक्षीय भागीदारीला गती देण्याच्या मार्गांविषयी चर्चा केली तसंच प्रादेशिक आणि बहुपक्षीय मुद्द्यांवरील आपली

भूमिका सांगितली. या द्विपक्षीय चर्चेनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात पंतप्रधान मोदींनी भारत-थायलंड संबंध आणखी वर नेऊन ते धोरणात्मक भागीदारीत बदलण्याचा निर्णय जाहीर केला.

**<u>युएसटेरिफ</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारी भागीदारी देशांमधून होणाऱ्या आयातीवर भरमसाठ कर लागू केल्यामुळे अमेरिकी शेअर बाजारांमध्ये जोरदार घसरण होऊन ते दोन वर्षातील नीचांकी पातळीवर आले. अमेरिकी रोखे बाजारांनी दुपारपर्यंत २ पूर्णांक सात लाख कोटी डॉलर्स बाजार भांडवल गमावल्याचं वॉल स्ट्रीटच्या बातमीत म्हटलं आहे. डाऊ इंडस्ट्रियल्स बाजार निर्देशांकात १३ शे अंकांची घसरण झाली तर नॅसडॅक ६ टक्क्यांनी कोसळला तर डाऊ जोन्स दिवसअखेरीस जवळपास ४ टक्क्यांनी घसरला. तत्पूर्वी दिवसाच्या सुरुवातीला आशियापासून युरोपपर्यंतच्या सर्व वित्तीय बाजारपेठांमध्येही जोरदार पडझड दिसून आली. तेलाच्या किंमतीमध्येही प्रती बॅरल २ डॉलर्सहून अधिक घट झाली. जागतिक व्यापार संघटनेनं या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली असून यावर्षी एकूण व्यापारात १ टक्का घट होण्याची शक्यता वर्तवली आहे.

**<u>राजनाथसिंह-एव्हरेस्टमोहीम</u>**

भारत आणि नेपाळच्या लष्करानं संयुक्तरीत्या आखलेल्या, माऊंट एव्हरेस्ट आणि माऊंट कांचनजंगा या गिर्यारोहण मोहिमांना केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नवी दिल्लीत हिरवा झेंडा दाखवला. नेपाळी लष्कराचे मेजर जनरल ध्रूव प्रकाश शाह या समारंभाला उपस्थित होते. एव्हरेस्ट शिखर मोहिमेचं नेतृत्व लेफ्टनंट कर्नल मनोज जोशी करत असून, या चमूत ३४ गिर्यारोहकांचा समावेश आहे. भारत-नेपाळ लष्कर संयुक्तपणे राबवत असलेल्या कांचनजंगा शिखर मोहिमेत भारतीय सैन्यातील १२ आणि नेपाळी सैन्यातील ६ गिर्यारोहकांचा सहभाग आहे भारतीय सैन्याचे कर्नल सर्फराज सिंग या चमुचं नेतृत्व करत आहेत.

**<u>डेप्युटीगव्हर्नर</u>**

डॉक्टर पूनम गुप्ता यांची रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या आधी त्या नवी दिल्लीतील नॅशनल कौन्सिल फॉर अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्चच्या महासंचालक पदावर कार्यरत होत्या. त्यांनी १ एप्रिल रोजी रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदाचा पदभार स्वीकारला. या पदावर त्यांची तीन वर्षांसाठी नेमणूक करण्यात आली आहे.

**<u>मनोजकुमारनिधन</u>**

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक मनोजकुमार यांचं आज सकाळी मुंबईच्या कोकिलाबेन रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. विशेषतः देशभक्तिपर चित्रपटांमध्ये भूमिका केलेल्या मनोज कुमार यांना भारत कुमार या नावानं ओळखलं जात होतं. चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी

मनोज कुमार यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. तसंच सरकारनं त्यांना पद्मश्री देऊननंही गौरवलं होतं.

**हॉकी**

उत्तरप्रदेशातील झाशी इथल्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर आजपासून पुरुषांच्या १५ व्या वरिष्ठ राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेला सुरुवात होत आहे. येत्या १५ तारखेपर्यंत चालणारी ही स्पर्धा मार्चमध्ये पार पडलेल्या महिला वरिष्ठ अजिंक्य स्पर्धेप्रमाणेच नवीन विभाग आधारित स्वरुपात होणार आहे. यामध्ये ३० संघ सहभागी होणार असून त्यांनी अ, ब आणि क अशा तीन विभागांत विभागणी करण्यात आली आहे. यापैकी ब आणि क विभागाचे सामने आजपासून सुरू होत आहेत. तर अ विभागाचे सामने ८ एप्रिलपासून सुरू होतील.

**आयपीएल**

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आय पी एल क्रिकेट स्पर्धेच्या काल झालेल्या साखळी सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स संघाने, सनरायझर्स हैदराबाद संघाचा ८० धावांनी पराभव केला. कोलकात्यातील ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स संघाने प्रथम फलंदाजी करत सनरायझर्स हैदराबाद संघासमोर २०१ धावांचं लक्ष्य ठेवलं. त्याला प्रत्यूत्तर देताना, सनरायझर्स हैदराबाद संघ १६ षटकं आणि ४ चेंडूत, १२० धावांत गारद झाला.

**खोखो**

जगन्नाथ पुरी इथं सुरू असलेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत पुरुष संघानं पश्चिम बंगालवर मात केली. तर महिला गटात महाराष्ट्र संघानं कोल्हापूरचा पराभव केला. आज उपांत्य फेरीचे सामने होणार असून राज्याच्या पुरुष संघाचा ओडिशा संघाबरोबर आणि महिला संघाचा दिल्लीच्या संघाबरोबर सामना होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.